# MET Bhujbal Knowledge City

## Institute of Engineering


OC

एम.इ.टी./बी.के.सी./आय.ओ.ई./जा.क्र./ दि. 02/12/2025

प्रती,
सहसंचालक,
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,
सामनगाव रोड, नाशिकरोड,
नाशिक.

विषय : सोमवार, दिनांक १ डिसेंबर २०२५ रोजी, "जागतिक एड्स दिन" ह्या उपक्रमाचा अहवाल सादर करणे बाबत.

संदर्भ : रासेयो-२०२५/प्र.क्र.११५/रासेयो कक्ष, दिनांक २८ नोव्हेंबर २०२५

महोदय,

वरील संदर्भीय पत्रानुसार प्रत्येक महाविद्यालयात मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांनी केलेल्या आवाहनास प्रतिसाद तसेच उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन तसेच भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालय यांचेकडून आलेल्या सुचनेनुसार जावक क्रमांक- रासेयो-२०२५/प्र.क्र.११५/रासेयो कक्ष, दिनांक २८ नोव्हेंबर २०२५, दिनांक १ डिसेंबर २०२५ रोजी, "जागतिक एड्स दिन" अभियान साजरा करण्याच्या सूचना करण्यात आलेल्या आहेत तरी वरील सुचनेनुसार या विशेष उपक्रमाचे आयोजन मुंबई एज्युकेशनल ट्रस्टचे अभियांत्रिकी महाविद्यालय, भुजबळ नॉलेज सिटी, आडगाव, नाशिक-३ येथे : सोमवार, दिनांक १ डिसेंबर २०२५ रोजी, "जागतिक एड्स दिन" मुंबई एज्युकेशनल ट्रस्टचे अभियांत्रिकी महाविद्यालय, भुजबळ नॉलेज सिटी, आडगाव, नाशिक-३. वेळ: सकाळी ११.०० वाजता ह्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, त्याचा अहवाल आपणास सविनयसादर करीत आहोत.

कळावे,

डॉ. विजयकुमार वाणी
प्राचार्य


Adgaon, Nashik - 422 003
Mobile : (91) 09881100099 | Tel. : (0253) 2303515 | Telefax : (0253) 2303203
E-mail : enquiries@bkc.met.edu | www.metbhujbalknowledgecity.ac.in
ISO 9001-2008 certified MET is an NGO in Special Consultative Status with United Nations (ECOSOC)

**INTERNAL NOTE**

| |
|---|
| Ref. No:- BKC/MET/IOE/Library/2025-26 |
| From:- Dr. Sambhaji Patil (Librarian) |
| To: - All Heads, MET-BKC-IOE, Nashik |
| Through: - Principal, MET-BKC-IOE, Nashik |
| Ref.:- रासेयो-२०२५/प्र.क्र.११५/रासेयो कक्ष, दिनांक २८ नोव्हेंबर २०२५ |
| Sub.: - सोमवार, दिनांक १ डिसेंबर २०२५ रोजी, "जागतिक एड्स दिन" म्हणून साजरा करणे बाबत... |
| Date:- २८ नोव्हेंबर २०२५ |

## नोटीस

महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकवृंद आणि विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते की, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या शासन परिपत्रक क्रमांक रासेयो-२०२५/प्र.क्र.११५/रासेयो कक्ष, दिनांक २८ नोव्हेंबर २०२५ नुसार सोमवार, दिनांक १ डिसेंबर २०२५ रोजी, "जागतिक एड्स दिन" म्हणून साजरा करण्याच्या सूचना प्राप्त झाल्या आहेत. त्या अनुषंगाने आपल्या महाविद्यालयात दिनांक १ डिसेंबर २०२५ रोजी, "जागतिक एड्स दिन" म्हणून साजरा करण्यात येणार आहे.

केंद्र शासनाच्या युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय यांच्या निर्देशानुसार उपरोक्त विषयास अनुलक्षून कळविण्यात येते की सोमवार दिनांक 1 डिसेंबर रोजी साजरा केला जाणारा जागतिक एड्स दिन जागतिक आरोग्य संघटनेने (WHO) प्रथम १ आपत्कालीन सेवांमध्ये एच.आय.व्ही/एड्स या आजाराबद्दल जागतिक जागरूकता वाढविण्यासाठी स्थापन केला होता हा दिवस उपचारांची उपलब्धता या आजाराचा प्रतिबंध करण्यासाठी आणि या रोगांचा अंत करण्यासाठी जागतिक उद्दिष्टे साध्य करणे यासारख्या विषयांवर लक्ष केंद्रित करण्यासाठी विकसित झाला आहे आणि तो UNAIDS सारख्या संस्थाद्वारे समन्वित केला जातो हा दिवस विविध कार्यक्रम शैक्षणिक मोहिमा आणि एकता दर्शविण्यासाठी प्रतीकात्मक लाल रिबन बांधून साजरा केला जातो. एड्स या आजाराच्या प्रादुर्भाव प्रतिबंध करण्यासाठी आपण आपल्या स्तरावर एड्स या आजाराविषयी महाविद्यालयीन विद्यार्थी घटक व समाजात व्यापक स्वरूपात जनजागृती मोहीम एकता रॅली, प्रश्नमंजुषा, भाषण स्पर्धा, पोस्टर्स स्पर्धा इत्यादी विविध उपक्रमांचे आयोजन आपल्या स्तरावरून सोमवार दिनांक १ डिसेंबर २०२५ रोजी साजरा करावयाचे आहे.

यानिमित्ताने वरील सुचनेनुसार आपण सोमवार दिनांक १ डिसेंबर २०२५ रोजी प्रत्येक वर्गामध्ये "जागतिक एड्स दिन" या आजाराविषयी जनजागृती करण्यात येणार आहे, तसेच जनजागृती मोहीम एकता रॅली, प्रश्नमंजुषा, भाषण स्पर्धा, पोस्टर्स स्पर्धा इत्यादी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. त्यानिमित्ताने आपण सर्वांनी ह्या कार्यक्रमास उपस्थित रहावे. सर्व प्रमुख, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी यामध्ये आपला सहभाग नोंदवावा, तुमची उपस्थिती हीच कार्यक्रमाची यशस्वीता आणि शोभा आहे.

- ☐ दिनांक: १ डिसेंबर २०२५, (सोमवार),
- ☐ वेळ: सकाळी ११.०० वा.

| | | |
|---|---|---|
| **डॉ. संभाजी पाटील**<br>ग्रंथपाल<br>प्रत : सर्व विभाग प्रमुख | **प्रा. योगेश पाटणी**<br>राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी | **डॉ. विजयकुमार वाणी**<br>प्राचार्य |

दिनांक 2 डिसेंबर २०२५

<u>अहवाल - "जागतिक एड्स दिन – सोमवार, दिनांक १ डिसेंबर २०२५</u>

अहवाल : जागतिक एड्स दिन साजरा कार्यक्रम
दिनांक : १ डिसेंबर २०२५
आयोजक : राष्ट्रीय सेवा योजना (NSS) विभाग

आयोजक: राष्ट्रीय सेवा योजना आणि मध्यवर्ती ग्रंथालय, एमईटी अभियांत्रिकी महाविद्यालय, भुजबळ नॉलेज सिटी, नाशिक

महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकवृंद आणि विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते की, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या शासन परिपत्रक क्रमांक रासेयो-२०२५/प्र.क्र.११५/रासेयो कक्ष, दिनांक २८ नोव्हेंबर २०२५ नुसार सोमवार, दिनांक १ डिसेंबर २०२५ रोजी, "जागतिक एड्स दिन" म्हणून साजरा करण्याच्या सूचना प्राप्त झाल्या आहेत. त्या अनुषंगाने आपल्या महाविद्यालयात दिनांक १ डिसेंबर २०२५ रोजी, "जागतिक एड्स दिन" म्हणून साजरा करण्याच्या सूचना करण्यात आल्या होत्या.

केंद्र शासनाच्या युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय यांच्या निर्देशानुसार उपरोक्त विषयास अनुलक्षून कळविण्यात येते की सोमवार दिनांक 1 डिसेंबर रोजी साजरा केला जाणारा जागतिक एड्स दिन जागतिक आरोग्य संघटनेने (WHO) प्रथम १ आपत्कालीन सेवांमध्ये एच.आय.व्ही/एड्स या आजाराबद्दल जागतिक जागरूकता वाढविण्यासाठी स्थापन केला होता हा दिवस उपचारांची उपलब्धता या आजाराचा प्रतिबंध करण्यासाठी आणि या रोगांचा अंत करण्यासाठी जागतिक उद्दिष्टे साध्य करणे यासारख्या विषयांवर लक्ष केंद्रित करण्यासाठी विकसित झाला आहे आणि तो UNAIDS सारख्या संस्थाद्वारे समन्वित केला जातो हा दिवस विविध कार्यक्रम शैक्षणिक मोहिमा आणि एकता दर्शविण्यासाठी प्रतीकात्मक लाल रिबन बांधून साजरा केला जातो. १ डिसेंबर हा दिवस "जागतिक एड्स दिन" म्हणून साजरा करण्यात यावा. एड्स या आजाराच्या प्रादुर्भाव प्रतिबंध करण्यासाठी आपण आपल्या स्तरावर एड्स या आजाराविषयी महाविद्यालयीन विद्यार्थी घटक व समाजात व्यापक स्वरूपात जनजागृती मोहीम एकता रॅली, प्रश्नमंजुषा, भाषण स्पर्धा, पोस्टर्स स्पर्धा इत्यादी विविध उपक्रमांचे आयोजन आपल्या स्तरावरून सोमवार दिनांक १ डिसेंबर २०२५ रोजी साजरा करण्याच्या सूचना करण्यात आलेल्या आहेत.

यानिमित्ताने वरील सुचनेनुसार आपण सोमवार दिनांक १ डिसेंबर २०२५ रोजी प्रत्येक वर्गामध्ये "जागतिक एड्स दिन" या आजाराविषयी जनजागृती करण्यात येणार आहे, तसेच जनजागृती मोहीम एकता रॅली, प्रश्नमंजुषा, भाषण स्पर्धा, पोस्टर्स स्पर्धा इत्यादी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

*प्रास्ताविक*

उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या शासन परिपत्रक क्रमांक रासेयो-२०२५/प्र.क्र.११५/रासेयो कक्ष दिनांक २८ नोव्हेंबर २०२५ नुसार संपूर्ण महाराष्ट्रातील महाविद्यालयांमध्ये १ डिसेंबर २०२५ रोजी "जागतिक एड्स दिन" (World AIDS Day) व्यापक जनजागृतीच्या उद्देशाने आयोजित करण्याचे निर्देश देण्यात आले. या आदेशाची पूर्तता करण्यासाठी व विद्यार्थ्यांमध्ये, शिक्षकांमध्ये तसेच समाजात एच.आय.व्ही./एड्स बद्दल जागरुकता निर्माण करण्यासाठी आमच्या महाविद्यालयात हा कार्यक्रम अत्यंत उत्साहात आणि भव्य स्वरूपात पार पडला.

जागतिक आरोग्य संघटना (WHO) व UNAIDS च्या मार्गदर्शनानुसार दरवर्षी १ डिसेंबर रोजी जागतिक एड्स दिन साजरा केला जातो. 1988 पासून हा दिवस जगभर साजरा करण्यास सुरुवात झाली. या दिवसाचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे:

- एड्स व HIV संक्रमणाबद्दल अंधश्रद्धा आणि गैरसमज दूर करणे
- प्रतिबंधात्मक उपायांबद्दल ज्ञान प्रसारित करणे

- संक्रमित व्यक्तींबद्दल सहानुभूती व सन्मान विकसित करणे
- AIDS मुक्त समाज निर्मितीसाठी जनसहभाग वाढवणे
- उपचार आणि हेल्थ सपोर्ट सेवा उपलब्धता यावर भर देणे

या कार्यक्रमाद्वारे महाविद्यालयाने शिक्षणासोबतच सामाजिक बांधिलकी जपत विद्यार्थ्यांना आरोग्य जागरूकतेचे महत्व अधोरेखित केले.

**उद्घाटन आणि मार्गदर्शन**

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ११.०० वाजता राष्ट्रगीताने झाली. यानंतर प्राचार्य डॉ. विजयकुमार वाणी यांनी उद्घाटनपर भाषण केले. त्यांनी एड्स प्रतिबंधामध्ये युवकांची भूमिका, सुरक्षित आरोग्य व जागरूकता याबद्दल माहिती दिली. प्रमुख अतिथी म्हणून ग्रंथपाल डॉ. संभाजी पाटील यांनी एड्सवरील उपलब्ध वैज्ञानिक साहित्य, संशोधन आणि माहिती स्रोतांचे महत्व अधोरेखित केले. कार्यक्रम अधिकारी प्रा. योगेश पाटणी यांनी NSS च्या सामाजिक कार्यामधील योगदानाची माहिती दिली.

**भाषण स्पर्धा आणि विद्यार्थ्यांचे विचार**

या कार्यक्रमात प्रथम वर्ष अभियांत्रिकी विद्यार्थ्यांनी एड्सविषयी वैज्ञानिक माहिती, समाजातील मिथक, सरकारी योजना, उपचार प्रणाली आणि सकारात्मक दृष्टीकोन यावर आधारित भाषणे दिली.

भाषण सादर करणारे विद्यार्थी

1. राम संगमनेरे
2. हार्दिक मलूअंजकर

त्यांनी खालील महत्त्वाचे मुद्दे मांडले:

- एड्स हा विषाणूजन्य संसर्ग आहे, तो स्पर्शाने, हस्तांदोलनाने, अन्न–पाणी किंवा एकत्र बसण्याने पसरत नाही
- HIV पासून संरक्षणासाठी सुरक्षित संबंध, रक्ताची तपासणी, स्वच्छ सिरिंज, गर्भावस्थेदरम्यान योग्य उपचार, यांची आवश्यकता
- संक्रमित व्यक्तींवर भेदभाव करणे हे सामाजिक गुन्हा आहे
- उपचार उपलब्ध आहेत आणि योग्य वेळी उपचार घेतल्यास रुग्ण चांगला आयुष्यकाल जगू शकतो

या प्रभावी भाषणांमुळे विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण झाली.

**एकता रॅली (Awareness Rally)**

महाविद्यालयाच्या NSS स्वयंसेवकांनी " पोस्टर, माहिती चार्ट" हातात धरून संपूर्ण महाविद्यालयाच्या परिसरात जागरूकता रॅली काढली. विद्यार्थ्यांनी खालील घोषवाक्ये दिली :

- "एड्सवर मात – जागरूकतेची साथ"
- "एड्सला नाही ज्ञानाला होकार"
- "HIV जागरूकता – समाजाची जबाबदारी"
- "भेदभाव नको – मानवता हवी"

रॅलीमधून विद्यार्थी, शिक्षक आणि नागरिकांमध्ये सामाजिक परिवर्तनाचा संदेश पोहोचविण्यात आला. प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी तयार केलेले वैज्ञानिक पोस्टर, माहिती चार्ट, 3D मॉडेल्स आकर्षणाचे केंद्र ठरले.

**कार्यक्रमाचा प्रभाव आणि यश**

या कार्यक्रमाच्या माध्यमातून महाविद्यालयात :

- एड्सबाबत विज्ञानाधारित योग्य माहिती पोहोचली
- गैरसमज आणि अंधश्रद्धा दूर करण्यास मदत झाली
- विद्यार्थ्यांमध्ये सेवा वृत्ती आणि सामाजिक जबाबदारी निर्माण झाली
- नेतृत्व व संघटन कौशल्य विकसित झाले
- समाजामध्ये जागरूकता वाढविण्यासाठी विद्यार्थी पुढाकार घेऊ लागले

विद्यार्थी आणि सर्व विभाग प्राध्यापकांच्या सक्रिय सहभागामुळे कार्यक्रम अत्यंत यशस्वी ठरला.

समारोप सत्रात प्राचार्य डॉ. विजयकुमार वाणी यांनी सर्वांचे आभार मानून भविष्यामध्येही अशा सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन केले. प्रा. योगेश पाटणी यांनी समन्वयक म्हणून कार्यक्रम यशस्वीपणे पूर्ण झाल्याबद्दल सर्वांच्या सहकार्याचे कौतुक केले. डॉ. संभाजी पाटील यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून माहितीपर पुस्तक प्रदर्शन आयोजित केले. “जागतिक एड्स दिन” हा फक्त औपचारिक कार्यक्रम नसून आजच्या युवकांना जबाबदार नागरिक बनविण्याचा मार्ग आहे. या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांनी समाजाला दिशा देण्याचे सामर्थ्य सिद्ध केले. आरोग्य, विज्ञान, मानवता आणि एकता या मूल्यांची जपणूक करण्याचा संकल्प सर्वांनी केला.

या प्रसंगी महाविद्यालयातील विविध विभाग प्रमुख आणि प्राध्यापक वर्ग देखील उपस्थित होते. त्यामध्ये डॉ. श्यामकुमार काळपांडे, डॉ. विठ्ठल गोंड, डॉ. शामराव गुमास्ते, डॉ. प्रशांत यावलकर, डॉ. पवन घुमरे, डॉ. दीपक कदम, डॉ. पुंडलिक जाधव, डॉ. विनोद खैरनार आणि डॉ. नमिता काळे यांचा सक्रिय सहभाग होता. उप ग्रंथपाल श्री भास्कर विसपुते यांनी सर्व प्राध्यापकवृंद आणि विद्यार्थी यांचे मनःपूर्वक आभार मानले




AIDS
GPS Map Camera
Google
Nashik, Maharashtra, India
S. No 1071 Bhujbal Knowledge City, Adgaon, Bhujbal
Knowledge City, Adgaon, Nashik, Maharashtra 422003, India
Lat 20.040405° Long 73.849827°
Monday, 01/12/2025 11:29 AM GMT +05:30


GPS Map Camera
Google
Nashik, Maharashtra, India
S. No 1071 Bhujbal Knowledge City, Adgaon, Bhujbal
Knowledge City, Adgaon, Nashik, Maharashtra 422003, India
Lat 20.04054° Long 73.849508°
Monday, 01/12/2025 11:22 AM GMT +05:30







| | | |
|---|---|---|
| **डॉ. संभाजी पाटील** | **प्रा. योगेश पाटणी** | **डॉ. विजयकुमार वाणी** |
| ग्रंथपाल | राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी | प्राचार्य |

NACO
National AIDS Control Organisation

सत्यमेव जयते

सार्वजनिक आरोग्य विभाग

MSACS

# उच्च जोखीम असल्यास, HIV ची चाचणी करून घ्या!




- HIV चे निदान लवकर झाल्यास योग्य उपचार वेळेवर मिळण्यास मदत होते.
- सरकारी रुग्णालयांमध्ये HIV चाचणी मोफत आणि गोपनीय आहे.

## HIV चाचणी केल्यानंतर काय होते?



चाचणी निगेटिव्ह आल्यास, सावधगिरी बाळगा.




चाचणी पॉझिटिव्ह आल्यास, डॉक्टरांचा सल्ला घ्या. आणि ताबडतोब HIV उपचार सुरु करा.



घाबरण्याची गरज नाही! योग्य उपचारांनी निरोगी जीवन जगता येते.

NACO
National AIDS Control Organisation

सत्यमेव जयते

सार्वजनिक आरोग्य विभाग
महाराष्ट्र शासन

MSACS महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था

# जर HIV ला ठेवायचे असेल तुमच्यापासून दूर
# तर खालील गोष्टी लक्षात ठेवा जरूर!

लैंगिक संबंध करताना प्रत्येक वेळी कंडोम चा वापर करा.

सुईचा आपसात पुनर्वापर करू नका. एकदाही नाही!

रक्तघटक, फक्त नोंदणीकृत रक्तपेढ्याकडूनच घ्या.

गर्भधारणेच्या पहिल्या तिमाहीत HIV ची तपासणी करायला विसरू नका.

## HIV प्रतिबंधाचे उपाय -

IGNORE नाही
पुन्हा **लक्षात** ठेवा!

अधिक माहितीसाठी राष्ट्रीय **एड्स हेल्पलाइन** क्रमांक AIDS Helpline 1097 वर संपर्क साधा आणि **HIV** चाचणीसाठी जवळच्या सरकारी रुग्णालयाला भेट द्या.